महाराष्ट्र टाइम्स
गुरुवार, १८ जुलै २०१९

# 'विवेकानंद'मध्ये लोकसंख्या दिन

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

कोल्हापूर टाइम्स टीम

'वाढत्या मानवी संसाधनांचा उपयोग कार्यक्षम लोकसंख्येत झाला पाहिजे. त्यासाठी शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. शिक्षण ही सामाजिक सेवा असून, ती निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणासाठीची अंदाजपत्रकीय तरतूद वाढवणे गरजेचे आहे. ही तरतूद वाढली तरच वाढती लोकसंख्या संशोधनात योगदान देईल आणि देश महासत्ता बनेल', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या भूगोल, अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र विभागाच्यावतीने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते.

भूगोल विभागप्रमुख प्रा. एच. पी पाटील यांनी प्रास्ताविक केले. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास पाटील यांनी ओळख करून दिली. माधवी जाधव हिने सूत्रसंचालन केले. प्रा. एच. व्ही. चामे यांनी आभार मानले. मटा

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

9

Scanned with OKEN Scanner

पुण्य नगरी
मंगळवार, १६ जुलै २०१९

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

# तर देश महासत्ता बनेल

## प्रा. पी. एस. कांबळे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

वाढत्या मानवी संसाधनांचा उपयोग कार्यक्षम लोकसंख्येमध्ये झाला पाहिजे. त्यासाठी शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. शिक्षणासाठीची अंदाजपत्रकीय तरतूद वाढवणे गरजेचे आहे. जर ही तरतूद वाढली तरच वाढती लोकसंख्या संशोधनामध्ये योगदान देईल व देश महासत्ता बनेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन करताना शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे. सोबत प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर आदी.

विवेकानंद कॉलेजच्या भूगोल, अर्थशास्त्र व समाजशास्त्र विभागांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर हे होते.डॉ. पी. एस. कांबळे म्हणाले, वाढत्या लोकसंख्येचा उपयोग उत्पादन कार्यात झाला पाहिजे. मानवी संसाधन विकास निर्देशांकाचा दर कमी होत चालला आहे. देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये वाढत्या लोकसंख्येचे संशोधनातील योगदान वाढले पाहिजे. लोकसंख्या व रोजगार यांची सांगड घातली तरच वाढत्या लोकसंख्येचा उदरनिर्वाह होऊ शकेल. वाढत्या लोकसंख्येला जर वेळीच आळा घातला नाही, तर गरिबी आणि आर्थिक विषमतेत वाढ होईल आणि अनेक सामाजिक समस्या निर्माण होतील. जर ही वाढती लोकसंख्या विकासामध्ये कार्यान्वित झाली नाही, तर तरुणांची शक्ती वाया जाईल.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर म्हणाले, सर्व समस्यांचे मूळ वाढती लोकसंख्या आहे. लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढते, त्या प्रमाणात जीवनावश्यक गरजा वाढत आहेत. कार्यक्रमाची सुरुवात रोपास पाणी घालून व प्रतिमापूजनाने झाली. प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास पाटील यांनी केली. आभार प्रा. एच. व्ही. चामे यांनी मानले. सूत्रसंचालन माधवी जाधव हिने केले. यावेळी वाय. डी. हरताळे, जी. एस. उबाळे, शुभांगी काळे, सोमनाथ काळे, दीपक तुपे, विकास मस्के, शर्मिला घाटगे आदी उपस्थित होते.

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

पुढारी कोल्हापूर, गुरुवार, २६ सप्टेंबर २०१९

# 'विवेकानंद'मध्ये राजकीय-अर्थशास्त्र मंचचे उद्घाटन

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद कॉलेजच्या राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'राजकीय-अर्थशास्त्र मंच' या विद्यार्थी, शिक्षक व अभ्यासक यांना एकत्र आणणाऱ्या बहुविद्याशाखीय मंचचे उद्घाटन समाज प्रबोधिनीचे सरचिटणीस प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य विभागाच्या प्रमुख डॉ. माधवी चरणकर होत्या. यावेळी राज्यशास्त्र विभागाच्या प्रा. समीक्षा फराकटे, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास पाटील, प्रा. डॉ. सोमनाथ काळे यांच्यासह राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डी. ए. पवार व विद्यार्थी उपस्थित होते.

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी

शनिवार, ४ जानेवारी २०२०

# विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची बाजार समितीस भेट

कोल्हापूर / प्रतिनिधी :

विद्यार्थ्यांना शेतीमालाची खरेदी-विक्री व्यवहार, लिलाव पद्धती, बाजार समितीप्रणाली समजून घेण्यासाठी विवेकानंद कॉलेजमधील कॉमर्स व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीस शैक्षणिक भेट देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी शेतीमालाची खरेदी-विक्री, लिलाव पद्धती व बाजार समितीच्या प्रणालीमध्ये शेतकरी, आडते, व्यापारी यांची भूमिका समजून घेतली.

या भेटीअंतर्गत ई नाम योजनेंतर्गत केंद्र शासनाने ई-ऑक्शनप्रणालीअंतर्गत कृषी विपणन राष्ट्रीय बाजार योजना व समितीचे भावी प्रकल्प इत्यादींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

यावेळी बाजार समितीच्या वतीने सुशांत मेढे-पवार व योगेश खाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आभार प्रा. पूजा पारिशवाड यांनी मानले. या भेटीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाय. डी. हरताळे, प्रा. संदीप पाटील यांनी केले होते. यावेळी बी.कॉम.-३ व बी.ए.-३ या वर्गातील अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# विवेकानंदमध्ये सावित्रीबाई फुले जयंती

कोल्हापूर / प्रतिनिधी :

विवेकानंद कॉलेज इतिहास विभागाच्या वतीने शुक्रवारी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १८९ वी जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विवेकानंद महाविद्यालयातील डॉ. शर्मिला घाडगे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची प्रस्तावना इतिहास विभागप्रमुख डॉ. मंजुश्री घोरपडे यांनी केली. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे प्रोत्साहन लाभले.

याप्रसंगी समाजशास्त्र विभागातील प्रा. स्नेहल घोरपडे सेट आणि नेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल प्रा. एस. एम. रुईकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. आभार डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी मानले. प्रा. एस. एम. रुईकर, प्रा. किरण पाटील, प्रा. डॉ. माधवी चरणकर, डॉ. कैलास पाटील, डॉ. दीपक तुपे, प्रा. सी. बी. दौडमणी, प्राध्यापक-प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner

पुढारी कोल्हापूर, शनिवार, ४ जानेवारी २०२०


# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची शेती उत्पन्न बाजार समितीस भेट

कोल्हापूर (प्रतिनिधी) : विद्यार्थ्यांना शेतीमालाची खरेदी-विक्री व्यवहार, लिलाव पद्धती, बाजार समिती प्रणाली समजावी यासाठी विवेकानंद महाविद्यालयातील कॉमर्स व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीस शैक्षणिक भेट देण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शेतीमालाची खरेदी-विक्री, लिलाव पद्धती व बाजार समितीच्या प्रणालीमध्ये शेतकरी, अडते, व्यापारी यांची भूमिका समजावून घेतली. बाजार समितीच्या वतीने सुशांत मेढे-पवार व योगेश खाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा पूजा पारिशवाड यांनी आभार मानले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner



वारणानगर : येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित 'बँकिंगमधील नोकरीच्या संधी', या विषयावर बोलताना डॉ. कैलास पाटील. सोबत प्रा. सुशांत माने, प्रा. रोहित बसनाईक, प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे, डॉ. सी. आर. जाधव.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Autonomous)

# बँकिंग क्षेत्राशी संबंधित कौशल्ये आत्मसात करा

## डॉ. पाटील : 'यशवंतराव चव्हाण'मध्ये कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

वारणानगर, ता. २९ : पदवी स्तरावर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे योग्य नियोजन आणि परिश्रम घेतले तर अल्पावधीत बँकिंग क्षेत्रात चांगली नोकरी मिळू शकते. दरवर्षी बँकिंग क्षेत्रामध्ये स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून हजारो जागा भरल्या जात आहेत. काही वेळा पात्र विद्यार्थी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे बँकिंग क्षेत्राशी संबंधित विविध कौशल्ये आत्मसात करावे, असे आवाहन कोल्हापूर येथील विवेकानंद महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. कैलास पाटील यांनी केले.

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागाच्या वतीने आणि करिअर ओरिएंटेड कोर्स अंतर्गत 'बँकिंग क्षेत्रातील नोकरीच्या संधी' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेखा शहापुरे होत्या.

प्राचार्या डॉ. शहापुरे म्हणाल्या, 'महाविद्यालयातील विनय कोरे करिअर ॲकॅडमीमध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राची सर्व सोयींनीयुक्त इमारत असून त्यामध्ये बँकिंग क्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या साठी स्वतंत्र बैठक व्यवस्था, संदर्भग्रंथ आणि मुलाखतीमध्ये यश प्राप्त करण्यासाठी स्वतंत्र मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात येईल त्याचा स्पर्धक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.'

स्वागत प्रास्ताविक डॉ. सी.आर. जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रवीण सातवेकर यांनी तर आभार विभागप्रमुख रोहित बसनाईक यांनी मानले. कार्यक्रम संयोजनासाठी प्रा. डॉ. प्रकाश चिकुर्डेकर, प्रा.आर.पी. कावणे, प्रा. विकास पाटील, प्रा. सुशांत माने, आदिनाथ नलवडे यांनी सहकार्य केले.

HEAD
DEPARTMENT OF ECONOMICS
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(AUTONOMOUS)

Scanned with OKEN Scanner